अतितातडीचे

वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांवर सरळसेवा प्रवेशाने उमेदवारांची भरती करतांना मुलाखतीसाठी निवड समितीवर समाजकल्याण अधिकारी, जिल्हा आदिवासी विकास अधिकारी व जिल्हा प्रकल्प अधिकारी यांना बोलविण्या बाबत -

अनुशेष भरती मोहिम, १९८९.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-१०८९/प्र.क्र. ३२६/८९/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २४ ऑक्टोबर, १९८९.

पहा :- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७३/जे, दिनांक २५ मे, १९७३

२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८४/१७७/१६-ब दिनांक २४ मे,१९७४ व सम‌क्रमांकाचे शुध्दीपत्र दि. ११ नोव्हेंबर १९८५.

३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८४/१७७/[सीआर-७२/८४]/१६-ब दिनांक १ जानेवारी, १९८८.

४] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८८/[प्र.क्र. ३/८९]१६-ब दि. १५ मार्च, १९८९.

परिपत्रक :- उपरोक्त शासकीय परिपत्रकाव्दारे वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदांवर मागासवर्गीयांची सरळ सेवा भरती करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या मुलाखतींच्या वेळी समाजकल्याण अधिकारी, जिल्हा प्रकल्प अधिकारी किंवा आदिवासी विकास अधिकारी [वर्ग-२ पेक्षा कमी दर्जा नसलेले] यांना हजर राहण्यासाठी बोलाविण्यात यावे व त्यांना सदर मुलाखतीस हजर राहाणे सोईस्कर व्हावे म्हणून त्यांना त्याबाबतची सूचना १५ दिवस अगोदर देण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहेत. अशा वर्ग-२ पेक्षा कमी दर्जा असलेल्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या मुलाखती आदेशानुसार नियमबाह्य ठरतात व अनियमित मुलाखतीव्दारे करण्यात आलेल्या नेमणुका नियमित करण्याबाबत नियुक्ती अधिकाऱ्यांची अडचण होते. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे व इतर अडचणीमुळे उपरोक्त समाजकल्याण अधिकारी/आदिवासी विकास व जिल्हा प्रकल्प अधिकारी यांना १५ दिवसांची पूर्वसूचना पाठवूनही काही प्रसंगी मुलाखतीस हजर राहणे शक्य होत नाही असे शासनाच्या पुन्हा निदर्शनास आणण्यात आले आहे.

२. मागासवर्गीयांच्या सरळसेवा भरतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी निवड मंडळांनी मागासवर्गीयांची पदे भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात जाहिराती दिलेल्या आहेत व त्या अनुषंगाने मुलाखती घेण्याचे काम त्वरेने व विहित मुदतीत होणे आवश्यक आहे. मुलाखतीसाठी

[कृ. मा. प. ]

१५ दिवस अगोदर सूचना पाठवूनही समाजकल्याण अधिकारी, आदिवासी जिल्हा प्रकल्प अधिकारी किंवा आदिवासी विकास अधिकारी [वर्ग -२ पेक्षा कमी दर्जा नसलेले] मुलाखतीच्या वेळेस गैरहजर राहतील किंवा उपस्थित न राहण्याबाबत त्यांनी संबंधितांना पूर्व सूचना दिली असेल तर निवड मंडळाने/नियुक्ती अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयातील किंवा इतर जवळच्या कार्यालयातील नियुक्ती अधिका-यांनी वर्ग-२ च्या पेक्षा कमी दर्जा नसलेल्या मागासवर्गीय अधिका-यांस मुलाखतीसाठी हजर राहण्याची विनंती करावी व ते काम पूर्ण करावे.

३. उपरोक्त परिच्छेद २ मधील सवलत ही फक्त अनुशेषाची पदे भरण्यासाठीच आहे. सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावानें,

प्र. द. माळवे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [मुळ शाखा], मुंबई,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे,
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग,
आदिवासी विकास विभाग,
इतर सर्व मंत्रालयीन विभाग,
सहाय्यक आयुक्त, सर्व विभागीय आयुक्त कार्यालये [मागासवर्ग कक्ष] प्रत्येकी ५ प्रती.

* पत्राने

---

एच-१२६[३५००-१०-८१]